(१)

C.O. Jalgaon
1598
13 OCT 1999

क्र.साप्रवि/गट-१ब/उपदान/ओम/४१३७३
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
प्रकाशगड,प्लॉट नं.जी-९,बांद्रा(पूर्व),
मुंबई-४०० ०५१
दि.२७.९.१९९९

# परिपत्रक

विषय :- रोजंदारीवरील कर्मचा-यांची सेवानोंद उपदानासाठी सेवापुस्तिकेत घेणे.

---

मंडळाने सर्वसाधारण आदेश क्र.७३(क) दि.२१.११.७३ नुसार, मंडळातील सर्व कर्मचा-यांना दि.१६.९.१९७२ पासून उपदान कायदा १९७२ लागू केला आहे. तद् अनुषंगाने प्रशिक्षणार्थी आणि शिकाऊ कर्मचा-यांव्यतिरिक्त मंडळाच सर्व स्थायी, अस्थायी, कार्यव्ययी आस्थापना व नाममात्र हजेरीपटावरील कर्मचारी सेवा उपदान मिळण्यास पात्र आहेत.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, काही क्षेत्रिय कार्यालयांकडून नाममात्र हजेरी पटावरील व कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचा-यांची सेवा, तत्संबंधीच्या सेवापुस्तिकेतील पुरेशा नोंदी अभावी उपदानास पात्र धरण्यात येत नाही. त्यामुळे कर्मचा-यांना नाममात्र हजेरीपट आणि कार्यव्ययी आस्थापनेवरील सेवा उपदानापासून वंचित ठेवण्यात येते अशा तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

तेव्हा सर्व क्षेत्रिय कार्यालयांना असे आदेश देण्यात येत आहेतकी, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत कार्यरत असणा-या नाममात्र हजेरीपटावरील व कार्यव्ययी आस्थापनेवरील परंतु आता कायमस्वरुपी नियुक्त केलेल्या सर्व कर्मचा-यांच्या सेवापुस्तिकेत तत्संबंधीच्या नोंदी घ्याव्यात. त्याचप्रमाणे ज्यांचे कायमस्वरुपी समावेशन अजूनही व्हावयाचे आहे, त्यांचे बाबतीत सुध्दा सेवापुस्तिकेत नोंदी घेण्यात याव्यात की, जेणेकरुन सेवासमाप्तीनंतर संबंधीत कर्मचा-यांना सेवा उपदान मिळण्यास अडचणी येणार नाहीत.

(सही)
संचालक(कर्मचारीवर्ग)

प्रत रवाना:-
कार्यकारी अभियंता व त्यावरील सर्व अधिका-यांना प्रेषण यादीप्रमाणे.

---

जा. क्र. अअ/जळ/आस्था/No 08620 दि. 18 OCT 1999

प्रति
का. अ. [प्रविभाग]/उ. अ. /लेखा. अ. /आ. अ. /
वि. ले. /त. ले. . . माहितीसाठी

(सही)
अधीक्षक अभियंता जळगाव